वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा,
पिंपरी चिंचवड शहर,
पोलीस आयुक्तालय, प्रेमलोक पार्क, चिंचवड,
पुणे – ४११ ०३३
फोन क्रं ०२० २६२०९१५७
ईमेल आयडी pieow.pcpc-mh@gov.in

प्रेसनोट पिंपरी चिंचवड दिनांक :- १३/०६/२०२४

# अशिक्षित/उच्चशिक्षीत व्यक्तींच्या नावे विविध कंपन्याची बनावट सॅलरी स्लीप बनवून बँकांकडून होम लोन, व इतर लोन घेवून बँकांची तसेच जनतेच्या पैशाची फसवणुक करणाऱ्या टोळीस आर्थिक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड यांचेकडून अटक

आर्थिक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड येथे अशिक्षित/उच्चशिक्षीत व्यक्तींच्या नावे विविध कंपन्याची बनावट सॅलरी स्लीप बनवून बँकांकडून लोन घेवून विविध बँकांची फसवणुक करत असल्याबाबत तक्रार प्राप्त झालेली होती. सदर तक्रारीवरुन हिंजवडी पोलीस स्टेशन गु.र.नं. ७०१/२०२४, भा.दं.वि.कलम- ४०६, ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), ३४ प्रमाणे गुन्हा नोंद होवुन गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखे मार्फत चालू करण्यात आला. यामध्ये आरोपींनी संगणमत करुन, पुर्वनियोजित कट रचून अल्पशिक्षीत व्यक्तींना ते उच्च शिक्षीत असल्याचे दाखवून लिस्टेड कंपनीमध्ये नोकरीस असल्याचे बनावट कागदपत्रे व सॅलरी स्लीप तयार करुन त्यांचे नावे ॲक्सीस बँक, आयसीआयसीआय बँक व इतर बॅकामध्ये होम लोन ,कार लोन, पर्सनल लोन मंजूर करवून घेतल्याचे व लोन अकाउंटचे काही हप्ते भरून तद्नंतर हप्ते न भरता लोन बुडित करून बँकांची व पर्यायाने जनतेच्या पैशांची फसवणुक केल्याचे तपासादरम्यान उघडकीस आले.

गुन्ह्यातील मुख्य आरोपी वासुदत्त भारत डुबे यास आरोपी प्रकाश थोरात याने मजूरी काम करनारे अशिक्षीत/अल्पशिक्षीत व्यक्ती विनोद शिंदे, विजय शिंदे व दिपक जंगम अशा व इतर व्यक्तींची कागदपत्रे पुरविली व सदर व्यक्तींना कमीशन देवून त्यांना लोन प्रक्रियेसाठी तयार करण्यात आले. त्यानंतर नमुद व्यक्तींच्या नावे प्रथम मोबाईल व सिमकार्ड घेवून ते मुख्य आरोपी वासुदत्ता याने स्वताकडे ठेवून घेतले व त्याचा वापर करु लागला. तसेच नवीन सिमकार्ड व त्यांचे कागदपत्रांच्या आधारे बँकेत खाते उघडले व बँक खात्याचा देखिल वापर तो स्वताच करु लागला. पुढे वासुदत्ता याने सदर अशिक्षीत/अल्पशिक्षीत व्यक्ती हे विविध कंपन्यामध्ये मॅनेजर/इंजिनियर/एच.आर. इ. उच्च पदावर नोकरीस असल्याचे कंपनीतील व्यक्तींच्या मदतीने दाखवून त्यांची बनावट सॅलरी स्लीपद्वारे त्यांचे खात्यावर सॅलरी क्रेडीट करवून घेतली. सदर सॅलरी स्लीप चा वापर करुन वासुदत्ता डुबे याने अशिक्षीत व्यक्तींचे नावे विविध बँकांकडून होमलोन, कारलोन, पर्सनल लोन मंजुर करुन घेतले लोन घेतेवेळीचे प्रक्रिये दरम्यान वासुदत्ता डुबे याने अल्पशिक्षीत व्यक्तींना ब्युबेरी होम्स, वाघोली पुणे येथील फ्लॅटवर ठेवले होते. लोन मंजूर झाल्यानंतर काही हप्ते भरुन नंतरुन लोन बुडित केल्याचे तपासात निष्पन्न झाले. तसेच कृतीका पोलावर यांनी देखिल बनावट सॅलरी स्पीपचे आधारावर एकाच वेळी पाच बँकांकडून लोन मंजूर करुन घेवून काही हप्ते भरुन लोन बुडवल्याचे तपासात निष्पण्ण झाले आहे. अशाच प्रकारे अशिक्षीत विनोद शिंदे व दिपक जंगम यांना ठाणे येथिल टेक्सास एलएलपी या कंपनीमध्ये सॉफटवेअर

Scanned with OKEN Scanner

इंजिनीअर या पदावर नोकरीस असल्याचे बनावटरित्या दाखवून व त्यांचे नावे सॅलरी स्लीप देवून त्यांचे नावे होम लोन पर्सनल लोन व कार लोन घेतले आहे.

गुन्हयाचे गांभीर्य पाहता मुख्य आरोपी वासुदत्ता भारत डुबे व साथीदार चंद्रकांत हरिदास मोरे, प्रकाश बळीराम थोरात, कृतिका पोलावर(डुबे), विनोद आण्णा शिंदे यांना एकाच दिवशी विवीध ठिकाणांहून सापळा रचून अटक करण्यात आली व पुढील तपासामध्ये नितीन चांदराणी, संदिप दिनकर खरात, स्वरूप तानाजी लिंभोरे यांचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना देखिल अटक करण्यात आली आहे. आतापर्यंतच्या तपासामध्ये एकुण १५ आरोपींचा सहभाग निष्पन्न झाला असुन ७ आरोपींचा शोध चालू आहे. गुन्हयातील प्रत्येक आरोपीने कमिशन बेसवर काम केले असून आरोपी वासुदत्ता याचेकडून विवीध बँकेचे चेकबुक, कंपन्यांचे नावचे शिक्के, अशिक्षीत व्यक्तींचे पॅनकार्ड, १२ मोबाईल फोन, सिमकार्ड, लॅपटॉप व इतर महत्वाचे दस्तावेज जप्त करण्यात आले आहेत. आतापर्यंतच्या तपासामध्ये २,२०,००,०००/- रक्कमेची बनावट बँक कर्जप्रकरणे उघडकीस आली असून कर्ज प्रकरणांची संख्या व फसवणूकीची रक्कम वाढत आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, मा.अपर पोलीस आयुक्त, श्री.वसंत परदेशी, मा. पोलीस उप आयुक्त श्री.संदिप डोईफोडे, मा. सहायक पोलीस आयुक्त श्री.विशाल हिरे, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मधुकर सावंत व आर्थिक गुन्हे शाखेचे पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड

Scanned with OKEN Scanner